॥ ॐ ॥

फेब्रुवारी २०२४

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org

## राष्ट्रीय विज्ञान दिन २०२४



२८ फेब्रुवारी १९२८ रोजी
भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकट रामन यांनी
रामन परिणामाचा (रामन इफेक्ट) शोध लावला.
हा दिवस भारतामध्ये विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो.
आणि तो साजरा करण्यासाठी प्रत्येक वर्षी एक संकल्पना (थीम) ठरवली जाते.
**यावर्षीची थीम ‘विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान’ अशी आहे.**



# अयोध्या राम मंदिर प्रतिष्ठापना सोहळा



२२ जानेवारीला वर्धिनीत हा सोहळा उत्साहात व मंगलमय वातावरणात साजरा झाला. सौ. सुचेता वाडेकर व साक्षी शिंदे यांनी काढलेल्या राम मंदिर व रामाच्या रांगोळीने सुरेख वातावरण निर्मिती झाली. बालवाडीची काही मुले रामपंचायतन वेशभूषा करून आल्याने ओंकार सभागृहाला मंदिराचे रूप प्राप्त झाले. सर्वांना मंदिरात आल्याचा भास होत होता. याआधी मंदिर आंदोलनात शहीद झालेल्या कारसेवकांना श्रद्धांजली अर्पून कार्यक्रमाची सुरुवात झाली. वर्धिनीतून दोनदा झालेल्या कारसेवेत काही वर्धक व कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यांचे अनुभव कथन झाले. सर्वांनी मिळून रामाचे भजन, रामरक्षा, राम जप केला आणि मुहूर्ताची वेळ जवळ आल्यावर सर्वजण स्तब्ध झाले. मोठ्या स्क्रीनवर राममूर्ती प्रतिष्ठापना सोहळा बघताना सर्वांचे डोळे पाणावले. रामाच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.








# शाखा विभाग

मागील वर्षाच्या यशानंतर यंदाही उत्कृष्ट शाखा चषक स्पर्धेचे आयोजन शाखा विभागाने केले. १५ जानेवारी २०२४ ते ३० मार्च २०२४ पर्यंत स्पर्धेचा पहिल्या टप्प्यात २५ जानेवारीला लोगो व ब्रीद वाक्य स्पर्धा घेण्यात आली. या मध्ये सोशल मिडीयाचा वापर करून वर्धकानी युवकांच्या मदतीने लोगो तयार केले. दि. ३० जानेवारिला 'समर्पण' या विषयावर आधारित 'पोस्टर मेकिंग' स्पर्धाही उत्साहात पार पडली. दोन्ही स्पर्धांमध्ये वर्धकांमधील नाविन्य, कल्पकता, विषयाची समज दिसून आली.

## उपक्रमशील शाखा





- स्वामी विवेकानंद शाखेने विविध उपक्रमांनी भरगच्च अशा बाल मेळाव्याचे आयोजन केले. १२० वर्धकांचा सहभाग असणाऱ्या या मेळाव्यात वैयक्तिक उपक्रम, कथाकथन, बोधकथा तसेच वर्धक व युवकांचा संवाद असे उपक्रम घेण्यात आले.
- स्वामी ब्रह्मानंद शाखेत १३ जानेवारीला रामकथा (कीर्तनातून रामकथा व रामचरित्र) मांडणी कीर्तनकार श्री. श्रीकांत घोडके यांनी केली. मानसिक विकास बैठकीच्या निमित्ताने समर्थ रामकृष्ण शाखेतील वर्धकांनी सोमवार पेठेतील शिवकालीन त्रिशुंड्या गणपती मंदिराला भेट दिली.
- धर्मवीर शंभुराजे शाखेच्या सायकल सहलीत ज्ञानप्रबोधिनी या संस्थेमध्ये एक अविस्मरणीय भेट झाली. २,००० रामायण ग्रंथांचे प्रदर्शन होते जे "१५ देश १८ लिपी ३४ भाषा" मध्ये लिहिले आहे..! असे प्रदर्शन पहायला मिळाले.








- समर्थ रामकृष्ण शाखेत विश्व हिंदी दिवस निमित्ताने १० जानेवारीला हिंदी दिवस साजरा करण्यात आला. परिपाठाला विश्व हिंदी दिवस का साजरा केला जातो ही माहिती सांगून हिंदी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. शाखेत पूर्ण वेळ हिंदीत संभाषण झाले.
- राजर्षी शाहू महाराज शाखेत २१ जानेवारीला पहाटे उपासनेनंतर मुलांचे तीन गट करून सकाळी व्यायामाला येणाऱ्या लोकांना आवाहन करून सूर्यनमस्कार घालण्याचा एक उपक्रम करण्यात आला. प्रत्येक गटाला कर्वेनगर व कोथरूड भागातील एक एक उद्यान ठरवून देण्यात आले. त्यांनी त्या उद्यानात जाऊन नागरिकांना १०० पेक्षा जास्त सूर्यनमस्कार घालायला प्रोत्साहित करायचे होते. गट क्रमांक १ कोथरूडचे उद्यान ४०५ सूर्यनमस्कार, गट क्रमांक २ ताथवडे उद्यान ७४३ सूर्यनमस्कार तर गट क्रमांक तीन ३ डहाणूकर कॉलनी येथील ठाकरे उद्यान येथे १३५ सूर्यनमस्कार घातले गेले. सगळ्या गटांच्या प्रयत्नातून एकूण १२८३ सूर्यनमस्कार घातले गेले.
- क्रांतीज्योती सावित्री शाखेत ३ जानेवारीला सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा घेण्यात आली. यानंतर महात्मा फुले वाड्याला वर्धिकांनी भेट दिली. त्यावेळी श्री. हरीश बोळे यांनी सावित्रीबाई फुलेंच्या जीवनपटाची माहिती सांगितली.








## युवा विभाग



यावर्षीच्या १० वी व १२ वी शुभेच्छा समारंभास प्रमुख वक्ते म्हणून श्री. राहुल पाखरे (पुणे विद्यापीठ, सिनेट सदस्य) यास बोलावले होते. कार्यक्रमात दादाने दैनिक दिनक्रम कसा असावा, शेवटच्या महिन्यातील प्राथमिकता कोणत्या असाव्यात हे सांगितले. Pre-planning, Planning, Implementation, व Punctuality या गोष्टींचे महत्त्व सांगितले. एकूण संख्या : ३१






# सायकल सहल २०२३ पुणे - पद्मदूर्ग - पुणे

"A Country With The Largest Democracy and Constitution" म्हणून ओळख असलेला हा आपला भारत देश. भारताच्या या संविधानाचे हे अमृत महोत्सवी वर्ष. यालाच समर्पित सायकल सहल आयोजित करण्याचे बैठकीत निश्चित झाले. या निमित्ताने 'स्व'-रूपवर्धिनीचे युवक 'पुणे ते पद्मदूर्ग' या सायकल प्रवासात ज्या ठिकाणी जातील तेथे संविधानाचा जागर करतील, घराघरात संविधान पोहचवतील असा संकल्प करण्यात आला. सायकल सहलीचा शुभारंभ संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.संजय तांबट यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी त्यांचे सायकल सहलीचे अनुभव आणि संविधानाविषयी युवकांना मार्गदर्शन केले. संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन करून प्रवास सुरू करण्यात आला. सायकल सहलीनिमित्त करण्यात आलेल्या या संकल्पात प्रत्यक्ष **७४ सायकलवीर** आणि त्यांच्या सोबत सात व्यवस्था गटातील सात युवक सहभागी झाले.

- **पहिला मुक्काम** - पहिल्या दिवसाचा प्रवास हा अतिशय कठीण होता. या आधी कधीच १२० किमीचा टप्पा एका दिवसात पार केला नव्हता. पण सायकलवीरांनी हे अंतर नियोजित वेळेत गाठले. पहिल्या दिवसाचा मुक्काम हा रोहा येथील श्री धाविर महाराज मंदिरात करण्यात आला. आपल्या युवकांची शिस्त आणि भोजनानंतरच्या स्वच्छतेने या मंदिरातील व्यवस्थापकांना खूप भुरळ घातली.
- **दुसऱ्या दिवशी** - मुरुड-जंजिरा हिंदू एज्युकेशन बोर्ड येथे पोहोचल्यावर मुरुड पद्मदूर्ग जागर आणि गडसंवर्धन समितीने सायकल वीरांचे जंगी स्वागत करीत या उपक्रमाचे कौतूक केले.
- **प्रत्यक्ष किल्ल्यावर** - फेरी बोटीने छत्रपती संभाजी महाराजांनी बांधलेल्या 'पद्मदुर्ग' पाहणीसाठी सर्व युवक निघाले. हा किल्ला सर्वांसाठी नवीन असल्याने कोणालाच किल्ल्याबद्दल अधिक माहिती नव्हती. निशिकांत वाईकर सरांनी 'किल्ला फिरताना नक्की कोणत्या गोष्टी पाहिल्या पाहिजेत ?' यावर मार्गदर्शन केले. किल्ल्यावर तीन गटांत 'पद्य आणि घोषणा स्पर्धा घेण्यात आली. किल्ला पाहून झाल्यावर सर्व युवकांनी समुद्रात खेळत मनसोक्त मज्जा केली.
- **गावात रुजलेली बंधूता** - परतीच्या प्रवासात तिसऱ्या दिवशीचा मुक्काम नारायणगांव येथे करण्यात आला. युवकांनी गावातील प्रत्येक घरात जाऊन संपर्क करत 'संविधान अमृत महोत्सवी वर्षा' ची माहिती गावकऱ्यांना दिली. आपल्या वर्धिनी प्रती प्रेम, आदर असणाऱ्या प्रशांत जोरकर दादांनी सर्वांचे अतिशय सुंदर आदरातिथ्य केले.
- **सायकल - सहवास - शिक्षण** - या सायकल प्रवासात सुधीर लिपारे, विनेश नगरे, निशिकांत वाईकर या अनुभवी युवकांनी सायकल ट्रेकसाठी काय तयारी करावी लागते हे सांगत त्यांचा मागील अनेक सहलींचा अनुभव सांगितला. या वयातही सायकल सहलीतील त्यांचा सहभाग सर्व नवीन युवकांना स्फूर्ती देणारा ठरला.

४ दिवस ३८५+ किमीच्या या सायकल प्रवासात युवकांना अनेक नवीन अनुभव आणि आठवणी मिळाल्या. सौरभ नांदे या आपल्या युवकाने या सहलीची प्रमुख म्हणून धुरा सांभाळली.

**महानगरपालिका आयोजित स्पर्धेत स्वामी दयानंद सरस्वती शाखेच्या सूर्या मोहोळ या बाल वर्धकाचा सत्कार करण्यात आला. २०२३ या वर्षीच्या योगासन स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळविला.**

# स्पर्धा परीक्षा केंद्र - अभ्यास दौरा



८ व ९ जानेवारीला केंद्राचा अभ्यास दौरा राजगुरुनगर, गावडेवाडी, ओझर व शिवनेरी येथे आयोजित केला होता. ३५० व्या शिवराज्यभिषेक दिनानिमित्त शिवनेरी किल्ल्यास भेट हे याचे वैशिष्ट्य होते. सकाळी आठ वाजता वर्धिनीतून निघून प्रवासात गप्पा, धमाल करीत राजगुरुनगरला गाडी पोहोचली. दौऱ्यातील विद्यार्थ्यांना प्रशासकीय दृष्टिकोन अनुभवण्यासाठी खेड पंचायत समितीला भेट देण्यात आली. पंचायत समितीत श्री. रामेश इष्ट (सहाय्यक प्रशासकीय अधिकारी) व सौ रुपाली तांदळे, (जलसंधारण अधिकारी-शाखा अभियंता)



यांनी लघु बंधारे बांधणी, प्रशासकीय संरचना, घरकुल आवास योजना, घनकचरा व्यवस्थापन या विषयांची सखोल माहिती

दिली. एखादे काम करताना येणाऱ्या अडचणी, अडथळे यावर उपाय कसे शोधावेत, जनप्रतिनिधींशी संवाद कसा असावा याची माहिती मिळाली.

दुपारच्या जेवणानंतर गावडेवाडी या २०२२-२३ साठी राष्ट्रपती पुरस्कार मिळालेल्या आदर्श गावाकडे गाडी रवाना झाली. गावचे सरपंच श्री. विजय गावडे (बीएस्सी, एमबीए) उच्चशिक्षित असून गाव सुधारण्यामध्ये त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. गावडेवाडी गावामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शाळेच्या मुख्याध्यापिका चिखले मॅडम यांनी शाळा दाखवली. तांत्रिक



शिक्षण व व्यावसायिक शिक्षण याची सांगड घातलेली प्राथमिक शाळा प्रथमच बघण्यात आली. या शाळेला स्वतःची सात एकर जमीन आहे.

शेतीच्या शिक्षणाबरोबरच संगणकाचे ज्ञानही मुलांना प्राथमिक शाळेपासून दिले जाते. विशेष म्हणजे शाळेला सरकारी मान्यता आहे पण उपक्रमांसाठी लागणारा निधी कंपन्यांच्या सीएसआर योजनेतून व गावातूनच उभारला जातो. शाळेत मुलींची पटसंख्या मुलांपेक्षा जास्त होती हे जास्त भावले. यानंतर हिरकणी माध्यमिक विद्यालयाला मुलांनी भेट दिली. या शाळेतही स्पर्धेच्या व विज्ञानाच्या युगामध्ये उपयुक्त असे व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण मुलांना देण्यात येते. आठवीतील मुले थ्रीडी प्रिंटर वापरून वेगवेगळे ऑब्जेक्ट्स बनवत असतात. यासाठी लागणारे सॉफ्टवेअर हीच मुले तयार करतात. रात्रीचा निवास ओझर गावी झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी गणपतीचे दर्शन घेऊन शिवनेरी किल्ल्यावर डॉ. अमोल पुंडे यांनी किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व सांगितले. श्री. बापू शिंदे यांनी छत्रपती शिवाजी हा विषय व्याख्यानातून मांडला. परतीच्या प्रवासात पिंपरी चिंचवड येथील पारधी समाजासाठी सेवा देणाऱ्या पुनरुत्थान समरसता गुरुकुलम या संस्थेस भेट दिली. संस्थेचे संस्थापक श्री. गिरीश प्रभुणे यांची पण भेट झाली. येथील शिक्षण पद्धती प्रामुख्याने कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमावर आधारित आहे. संस्थेचे संस्थापक श्री. गिरीश प्रभुणे सरांनी पारधी समाजातील सामाजिक प्रश्न स्पष्ट करणारे अनुभव सांगितले.



## आनंद वार्ता

फेब्रुवारी २०२४ मध्ये स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिकेमधील या विद्यार्थ्यांची राज्य सेवा आयोगातून निवड झाली.

- **आरोग्य विभाग** - १) श्री. संग्राम औताडे २) श्री. महेश शरमाळे
- **सार्वजनिक बांधकाम विभाग** - ज्युनियर इंजिनिअर १) श्री. भालचंद्र हिरगिले २) श्री. नीरज पोटावडे
- **असिस्टंट ज्युनियर इंजिनियर** - कुमारी पूजा पाडवी, तलाठी - श्री. गोपाळ राऊत (वर्धा)

# पाकोळी बालवाडी

- सर्व वर्गात नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात स्नेहसंमेलनाची तयारी उत्साहात चालू होती. २१ डिसेंबरला डॉ. आंबेडकर सांस्कृतिक भवनात बालवाडीचे स्नेहसंमेलन शाहीर हेमंतराजे मावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. शाहिरांच्या हस्ते वेशभूषा स्पर्धेतील बक्षीसप्राप्त मुलांना आणि रांगोळी स्पर्धेतील विजयी पालकांना बक्षिसे देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्ताने शिवरायांचे चरित्र मांडणी करणारी गाणी या कार्यक्रमात सादर झाली. बाल शाखेच्या मुलांनी नृत्य सादर करताना मनोरे उभारून प्रेक्षकांची दाद मिळवली. छोट्या गटातील मुलांनी शिवरायांचा पाळणा गीत सादर केले तेव्हा छोट्या जिजाबाईंच्या अर्थपूर्ण अभिनयाने सर्वांचे डोळे पाणावले. स्नेहसंमेलनातील नृत्य, नाट्य सादरीकरण सगळ्यांच्या स्मरणात राहील. यामागे सर्व शिक्षिकांचे मोलाचे कष्ट आहेतच पण मुलांनी सर्व शिक्षिकांच्या कल्पना रंगमंचावर प्रत्यक्षात उतरवल्या, याबद्दल त्यांचे सगळ्यांनी कौतुक केले.



- जानेवारी महिन्यात छोट्या गटाची आबा बागुल उद्यान, सहकारनगर तर मधल्या व मोठ्या गटाची छत्रपती शिवाजी उद्यान, वडगाव शेरी येथे सहल झाली. पालकांनी उत्साहाने फुगे फुगवून, फुलांच्या माळा लावून गाड्या सजवल्या. गाड्यांमधून जाताना गाणी, भजन, गजर, श्लोक







म्हणताना मुलांना बाग कधी आली ते कळलेच नाही. बागेत पोचल्यावर मुलांनी खेळण्यांकडे धाव घेतली. घसरगुंडी, झोका, सीसॉ, जंगल जिम खेळण्यात मुले रमली. बागुल उद्यानातील विविध आदिवासी लोकांचे व प्राण्यांचे पुतळे मुलांनी कुतूहलाने बघितले. वडगाव शेरीतील बागेत मुलांनी छोट्या आगगाडीतून फिरण्याचा आनंद घेतला.

- गुरुकुल चित्रकला स्पर्धेत सर्व गटातील मुलांनी भाग घेतला. बालवाडीतील दहा मुलांना बक्षिसे मिळाली तार उत्तम सहभागाबद्दल पाकोळी बालवाडीला चषक मिळाला.




- २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी मोठ्या गटातील मुलांनी देशभक्तीपर गीत सादर केले. तसेच क्रांतिकारक, समाज सुधारक अशा वेशभूषा करून त्यांची घोषवाक्ये म्हणून दाखवली. मधल्या गटातील कुमार पाटणे यांनी डॉ. बाबासाहेबांची वेशभूषा करून त्यांचे कार्य सांगितले. टाळ्यांच्या गजरात त्याचे सर्वांनी कौतुक केले. ध्वजारोहण डॉ. नयना नवांगुळ यांच्या हस्ते झाले. ध्वजारोहणानंतर स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांची त्यांनी संवाद साधला.






# समुपदेशन विभाग





◆ जानेवारी महिन्यात शालेय मुलांसाठी एकात्मिक स्वयं-विकास सत्रांचे आयोजन विभागातर्फे करण्यात आले.
१२ शाखांतील जवळपास १३० विद्यार्थ्यांशी अभ्यास कौशल्ये, वेळेचे व्यवस्थापन, ध्येय निश्चिती, वेळापत्रकाचे महत्त्व, स्व-विश्लेषण, चांगल्या-वाईट सवयी अशा विविध विषयांवर संवाद साधण्यात आला.



◆ १० वी बोर्ड परीक्षांसाठी सत्र - एच.एम.पटेल शाळेत दहावीच्या बोर्ड परीक्षेची मानसिक तयारी कशी करावी या विषयावर सत्र आयोजित करण्यात आले होते. लाभार्थी संख्या : २५.



◆ IQ चाचणी : विवेकानंद शाखेच्या ४५ विद्यार्थ्यांची IQ चाचणी घेण्यात आली.



**या महिन्यातील लाभार्थ्यांची संख्या : २००.**

◆ विविध शाळांमध्ये 'पंचकोश विकास' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यातील काही निवडक प्रतिक्रिया - आमच्या सेनापती बापट विद्यालयात मेघाताईंनी मैत्री, प्रेम, आकर्षण, ओळख स्पर्शाची याविषयी माहिती सांगितली. मेघाताई ज्या ज्या वेळी येतात तेव्हा त्यांच्यासोबत सर्व गोष्टी शेअर कराव्यात असे वाटते. त्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी, जसे आईला मदत करा, मोठ्यांचा आदर करा, मैत्री कशी करावी, नियोजन करून अभ्यास करा हे ऐकून तसे वागण्याचा मी प्रयत्न करते.

- श्रुतिका कैलास पटेकर (९ वी)

◆ आजपर्यंत आम्हाला कोणीच सांगितले नाही अशा पंचकोश, स्पर्श ओळख, मैत्री अशा विषयांची माहिती मेघाताईंनी आम्हाला दिली. घरच्यांशी जे विषय आम्ही बोलू शकत नाही त्यावर तुमच्याशी आम्हाला मनमोकळेपणाने बोलता येते. 'स्वतःवर संयम ठेवायला शिका', 'शिक्षण हे खूप महत्त्वाचे आहे', 'स्वतःला समजून घ्या', 'खूप मोठे व्हा' या तुम्ही सांगितलेल्या गोष्टी कधीच विसरण्यासारख्या नाहीत. मी नेहमी तुम्ही सांगितल्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करते.

- निकिता रामचंद्र गोरे (९ वी)

# उत्थान विभाग

## मासिक प्रशिक्षण

१४ जानेवारीला मासिक प्रशिक्षणात सुरुवातीला सर्व अभ्यासिका प्रमुखांना शिकता शिकविता या कार्यक्रमात सहभागी करण्यात आले. श्री. निलेश निमकर यांनी त्यांच्या पुस्तकातील काही निवडक लेखांचे अभिवाचन करून खालील मुद्द्यावर चर्चा केली.

◆ मुलांचे पूर्वज्ञान हे त्यांच्या शिकण्याचा पाया असतो.

◆ मुलांना कोणत्या गोष्टीची माहिती आहे हे जाणून घेऊन त्यांना शिकवायला हवं.

◆ चांगला शिक्षक हा मुलांना का येते हे समजून घेऊन प्रत्यक्ष कृतीद्वारे मुलांना शिकवण्याचा प्रयत्न करतो.

◆ अभ्यासक्रम जरी सारखा असला तरी प्रत्येक मुलाला शिकवण्याची पद्धत वेगळी असते.

◆ प्रत्येकाची शिकून घेण्याची, समजून घेण्याची, पातळी वेगळी असते ती क्षमता लक्षात घेऊन कृतीच्या सहाय्याने मुलांना शिकवावे.

या कार्यक्रमानंतर अभ्यासिका प्रमुखांचा मासिक आढावा मोनाली ताई यांनी घेतला. संदीप सरांनी अभ्यासिका प्रमुखांशी काही विशेष बाबी विषयी चर्चा केली व त्यांना मार्गदर्शन केले.

# किशोरी विकास एकत्रीकरण

◆ २१ जानेवारीला कसबा भागातील किशोरींच्या एकत्रिकरणामध्ये प्रकल्प समन्वयक तेजल शर्मा यांनी जिजामातेचे आचार व विचार या विषयी मुलींना माहिती सांगितली. संख्या – १७

◆ २८ जानेवारीला भवानी भागाच्या एकत्रीकरणात प्रसारमाध्यमे व त्याचे दुष्परिणाम या विषयावर सौ. मोनाली यंदे यांनी मुलींशी संवाद साधला. संख्या – १४

# RSB शिष्यवृत्ती मुलाखत

दरवर्षी वस्तीतील गरजू व हुशार मुलांना RSB फाऊंडेशन तर्फे शिष्यवृत्ती देण्यात येते. आपल्या अभ्यासिकांमध्ये येणाऱ्या अशा मुलांचे नियमित निरीक्षण करून त्यांची निवड करण्यात येते. यावर्षी त्यासाठी दि. ६ जानेवारी ते १३ जानेवारीला वर्धिनीमध्ये निवडक ३९ वर्धक व वर्धिकांची मुलाखत घेण्यात आली.

# हिरकणी अभ्यासिका उद्घाटन कार्यक्रम

२७ जानेवारीला उत्थान विभागामधील महात्मा फुले नगरातील अभ्यासिकेचे उद्घाटन व नामकरण कार्यक्रम पार पडला. वर्धिनीचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी, उत्थान विभाग पालक श्री. संदीप मोरे, अभ्यासिका प्रमुख, पालक वर्ग, वस्ती मधील कार्यकर्ते व भाग समन्वयक उपस्थित होते. एकूण संख्या – ५५.

# क्रीडा दिन

शारीरिक क्षमता वाढ, संघटन, खेळाच्या माध्यमातून स्वयंशिस्त आणि खिलाडूवृत्ती वाढवणे या उद्देशाने ०७ जानेवारीला क्रीडा दिन आगरकर मुलींचे हायस्कूल सोमवार पेठ येथे घेण्यात आला. त्यामध्ये शंभर मीटर धावणे, सूर्यनमस्कार, दोरीवरच्या उड्या, बादलीत चेंडू टाकणे, लंगडी, डॉज बॉल अशा सांघिक व वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन उत्थान विभाग पालक संदीप मोरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला स्वरूपवर्धिनी कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी तसेच सोलापूर वरून काही पाहुणे श्री. अशोक ताराचंद संकलेजा, श्री. राजेंद्र रामचंद्र काटवे, श्री. रंगनाथ कापूर, श्री. संतोष कुलकर्णी, श्री. सुनील भराडकर आले होते. हर्षवर्धन गायकवाड दादा व प्रसाद दासरी दादा यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पडली. सर्वच खेळामध्ये मुलांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या चेहऱ्यावर एक उत्साह आनंद दिसून येत होता.









# विजयी स्पर्धक व अभ्यासिका

| स्पर्धा | स्पर्धकाचे नाव | अभ्यासिका |
|---|---|---|
| लिंबू चमचा स्पर्धा( लहान गट) | प्रथम अनुष्का बेगम<br>द्वितीय भाविका सोलंकी<br>तृतीय नंदिनी कुंजीर<br>उत्तेजनार्थ पियुष गुप्ता | समता अभ्यासिका<br>श्रमिकनगर अभ्यासिका<br>कामगार अभ्यासिका<br>प्रियदर्शिनी अभ्यासिका |
| सुर्यनमस्कार स्पर्धा(मोठा गट) | प्रथम सृष्टी लांडगे<br>द्वितीय यश सरोज<br>तृतीय आकाश सरोज<br>उत्तेजनार्थ अलिशा शेख | शिवराय अभ्यासिका<br>प्रियदर्शिनी अभ्यासिका<br>प्रियदर्शिनी अभ्यासिका<br>समता अभ्यासिका |
| १०० मीटर धावणे स्पर्धा (मोठा गट) | प्रथम सौरफ लल्लू सरोज<br>द्वितीय आदित्या नितीन ससाणे<br>तृतीय यश राजेश सरोज<br>उत्तेजनार्थ समृद्धी मोहिते | प्रियदर्शनी अभ्यासिका<br>आर्यभट्ट अभ्यासिक<br>प्रियदर्शीनी अभ्यासिका<br>शिवरत्न अभ्यासिका |
| १०० मीटर धावणे स्पर्धा (लहान गट) | प्रथम हर्ष बंडोबा चव्हाण<br>द्वितीय विराट मनिषा सांळुखे<br>तृतीय प्रणव राजू काटे<br>उत्तेजनार्थ गणेश दिवटे | राजामाता जिजाऊ अभ्यासिका<br>श्रमीक नगर अभ्यासिका<br>भवानी माता संस्कार वर्ग<br>महाराणा प्रताप अभ्यासिका |
| थ्रो बॉल (लहान गट) | प्रथम भव्या परदेशी<br>द्वितीय युवराज काळे | भिमाई अभ्यासिका<br>राजमाता जिजाऊ अभ्यासिका |
| दोरीवरील उड्या स्पर्धा (लहान गट) | प्रथम स्वरुपा घोलप<br>द्वितीय दुर्वा घोलप | महात्मा फुले अभ्यासिका<br>महात्मा फुले अभ्यासिका |
| दोरीवरील उड्या स्पर्धा (मोठा गट) | प्रथम काव्या देवकुळे<br>द्वितीय साई काटे | वीर लहुजी अभ्यासिका<br>स्वरूप अभ्यासिका |
| डॉज बॉल स्पर्धा सांघिक (मोठा गट) | प्रथम आर्यभट्ट अभ्यासिका<br>तृतीय भिमाई-शिवरत्न अभ्यासिका | द्वितीय शिवराय- स्वरूप अभ्यासिका<br>उत्तेजनार्थ महात्मा फुले अभ्यासिका |
| लंगडी स्पर्धा सांघिक (मोठा गट) | प्रथम प्रियदर्शिनी अभ्यासिका<br>द्वितीय शिवराय अभ्यासिका<br>तृतीय भिमाई - स्वरूप- उत्कर्षा अभ्यासिका<br>उत्तेजनार्थ कामगार मैदान - वीर लहुजी वस्ताद अभ्यासिका | |
| लंगडी स्पर्धा सांघिक (लहान गट) | प्रथम समता - कामगार मैदान अभ्यासिका<br>द्वितीय राजमाता जिजाऊ अभ्यासिका<br>तृतीय महाराणा प्रताप अभ्यासिका<br>उत्तेजनार्थ उत्कर्षा- मणिकर्णिका अभ्यासिका | |

# क्षण आनंदाचे... क्षण अभिमानाचे...

- अंजनीबाई विठ्ठलराव मोहिते प्रतिष्ठानचा माऊली प्रेरणा पुरस्कार **'स्व'-रूपवर्धिनी**ला प्रदान.

- 'स्व'-रूपवर्धिनी चे उपाध्यक्ष **श्री. शिरीषजी पटवर्धन** यांना २०२४ या वर्षाचा वसुधा परांजपे स्मृती पुरस्कार (शिक्षण) जाहीर झाला आहे.




- पद्मश्री महर्षी डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ (माई) यांच्या स्मृतिदिनानिमित्त देण्यात येणारा 'यशोदा माई राष्ट्रीय पुरस्कार २०२४' **श्रीमती पुष्पाताई नडे** यांना प्रदान.



- माय होम इंडिया संस्थेच्या वतीने 'स्व'-रूपवर्धिनीच्या बचतगटाच्या प्रमुख कार्यकर्त्या **सौ. वनिताताई जगताप** यांना राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




- माय होम इंडिया या सामाजिक संस्थेचा राष्ट्रीय स्वामी विवेकानंद युवा पुरस्कार २०२४ स्वामी जितेंद्रानंद सरस्वती (सरचिटणीस, गंगा महासभा), पद्मश्री मिलिंद कांबळे यांच्या हस्ते आपल्या वर्धिनी परिवारातील **श्री. महेशजी पवळे** आणि **श्री. निलेशजी धायरकर** या दोन कर्तृत्ववान युवा नेतृत्वांना प्रदान.



- मातृशक्तीचा यावर्षीचा आदर्श माता पुरस्कार **श्रीमती नीला बसवंत कुडलिंगार** यांना देण्यात आला.

हार्दिक अभिनंदन

